**महाराष्ट्र शासन**

**सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२**

*सामान्य प्रशासन विभाग,*

*मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.*

*क्रमांक:अशैसं-२००७/१०९ /प्र.क्र१४३/२००७/३५      दिनांक :- १९ ऑक्टोबर, २००७.*

# ना-हरकत प्रमाणपत्र

विवेकानंद एज्युकशन सोसायटी, पहिला माळा, अनेक्स बिल्डींग, विवेकानंद महाविद्यालय परिसर, सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई *या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.०६.०७.२००७ रोजी अर्ज सादर केला होता. या अर्जातील माहिती व अर्जासोबतच्या संबंधित कागदपत्रांची प्राथमिक छाननी, याकरिता नियुक्त केलेल्या छाननी समितीने केली. छाननी समितीच्या निष्कर्षानुसार तसेच दि.१२ ऑक्टोबर, २००७ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.असंसं-२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या भाषिक (सिंधी) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोग अधिनियम, २००४ च्या कलम २ (छ) च्या अर्थानुसार व भारतीय संविधानाच्या कलम ३० अंतर्गत अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.*

*हे ना-हरकत प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.*

*उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला भाषिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून पुढील तीन वर्षाकरिता विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.असंसं- २००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील. या निकष व अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेचा अल्पसंख्याक दर्जा रद्द करण्यात येईल.*

सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन

टी. एफ. थेक्केकरा

**( टी. एफ. थेक्केकरा )**

*सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२*

*सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन*

*मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.*

VES COLLEGE OF PHARMACY
Date 08.11.07
Inward No. 156
Signature
CHEMBUR, MUMBAI-400 071

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

**शासन निर्णय :-** क्र.टिइएम-२००७/(२७९ /०७)/तांशि-१,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : - ३० जून, २००७ .

**संदर्भ:-** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद , नवी दिल्ली यांचे दिनांक २७ जून, २००७ चे पत्र क्र. ०७/०८/MS/PHARM/२००७/०१२ III

शासन निर्णयः- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये खालीलप्रमाणे संस्थेस शैक्षणिक वर्ष २००७-२००८ करिता औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | विवेकानंद एज्युकश्न सोसायटीचे कॉलेज ऑफ फार्मसी हशू अडवाणी मेमो. कॉमप्लेक्स, कलेक्टर कॉलनीच्या मागे, वधावाल व्हिलेज, चेंबूर मुंबई ४०० ०७१. | बी फार्मसी | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २००७-२००८ पासून औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधन कारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापिठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापिठांची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांने / संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी ऑफ इंडिया , नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

६) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

७) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य मुंबई व संबंधित विद्यापिठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
मुंबई विद्यापिठ मुंबई
संबंधित संस्था (संचालकां मार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.